# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दुरध्वनी क्रमांक (वै)<br>दुरध्वनी क्रमांक (का) | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे स्टेशन मागे,<br>पुणे § ४११००१, दुरध्वनी§ ०२० § २६०५८२१८, २६०५८१०९<br>Email § spm.pune1@gmail.com |
| आरोग्य सेवा | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य- कक्ष १५क/ हिरकणी कक्ष स्थापन करणेबाबत/ ९०८४-९५४ /२०१७<br>दिनांक - ०३/०२/२०१७ |


०६१

प्रति,

- **जिल्हा आरोग्य अधिकारी,**
  जिल्हा परिषद ......... (सर्व)

- **जिल्हा शल्य चिकित्सक**
  सामान्य रुग्णालय ....... (सर्व)

**विषयः-** "MAA" कार्यक्रमांतर्गत नवीन हिरकणी कक्षाच्या स्थापनेबाबत व स्थापित हिरकणी कक्षांच्या बळकटीकरण, मुल्यमापन व सनियंत्रणाबाबतच्या सुधारित मार्गदर्शक सुचना....

**संदर्भः-** या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.राकुकका/ आरसीएच/बाल आरोग्य/१५ क/५६७७० दि. ३०/०७/२०१२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, राज्यात प्रा.आ.केंद्र/ ग्रामीण/ उपजिल्हा/ जिल्हा/ सामान्य/ स्त्री रुग्णालयात हिरकणी कक्ष स्थापन कराण्याच्या सुचना यापुर्वी देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे आपल्या स्तरावर हिरकणी कक्षाची स्थापना करण्यात आली असावी अशी धारणा आहे. राज्यातील बालमृत्यु दर तसेच कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी मातांमध्ये बालकांच्या कुपोषणाबाबत जागृती करणे आवश्यक आहे. नवजात शिशुंना जन्मानंतर एका तासाच्या आत स्तनपान, सहा महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान, सहा महिने पुर्ण झाल्यावर घरगुती, मऊसर पोषक पुरक आहार तसेच दोन वर्षापर्यंत स्तनपान दिल्यास बालकामधील कुपोषणाचे प्रमाण व पर्यायाने बालमृत्यु दरही कमी होईल.

राज्यात राबविल्या जाणाऱ्या " MAA " कार्यक्रमाद्वारे स्तनपानास प्रोत्साहान, संरक्षण व आधार देता येईल. हिरकणी कक्षाचे सक्षमीकरण हा " MAA" कार्यक्रमाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी उदिद्ष्टये व मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे :

**अ) उदिद्ष्टे :**

१) स्तनपान व शिशूपोषणाला प्रोत्साहन तसेच मातांना स्तनपानासाठी संरक्षण व आधार
२) स्तनपानासाठी पोषक वातावरण व संवेदनशिलता निर्माण करण्यासाठी
३) बाळ मागेल तेव्हा मागेल तेवढया वेळेस स्तनपान देता यावे यासाठी
४) मातांना स्तनपानासाठी व शिशुपोषणाबाबत समुपदेशन करण्यासाठी

**ब) हिरकणी कक्ष कुठे व कसे स्थापन करावे :**

१) हिरकणी कक्ष जिल्हयातील सर्व L2 व L3 डिलीवरी पॉईंटस असलेल्या आरोग्य संस्थेत स्थापित करावे.
२) हिरकणी कक्षा करीता ६०×६० ची स्वतंत्र खोली असावी. सर्वसाधारण बालरोग व स्त्रीरोग OPD च्या जवळ असावी जेणे करुन सर्वच मातांना लाभ घेता येईल.

३) ही खोली स्वच्छ असावी. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी.

४) या खोलीत १ कॉट, गादी, तक्के, उशा, चांगल्या बेडसीट व रिकलायनिंग खुर्ची असावे. जेणेकरुन माता आरामशीर पद्धतीने (बसुन/ झोपून) बाळाला स्तनपान करु शकेल.

५) हिरकणी कक्षाच्या भिंतीवर स्तनपान व शिशूपोषणाची माहिती दर्शविणारे चार्टस् लावावेत जेणेकरुन स्तनपान करतांना ती वाचू शकेल व तिला काय समस्या असेल तर विचारु शकेल.

६) बाळासाठी खेळणी उदा. खुळखुळा, बाहुली, इ. साहित्य असावे. तसेच बाळाला नटविणेकरीता आरसा, कंगवा, पावडर इ. असावे.

७) लाभ घेतलेल्या मातंच्या नोंदी रहाव्यात या करीता एक रजिस्टर ठेवावे. त्यांनी किती वेळ लाभ घेतला व त्यांचे अभिप्राय इ. नोंदी कराव्यात.

८) या कक्षात पुरुषांना मनाई आहे असा बोर्ड लावावा.

९) परिचर, औषधनिर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य कर्मचारी या सर्वाना स्तनपान व शिशुपोषणाचे मुलभूत प्रशिक्षण दयावे व या कक्षाचा उपयोग स्तनदा मातांनी करावा या करीता येणाऱ्या प्रत्येक मातांना प्रवृत्त करावे.

वरील प्रमाणे मातांचा सन्मान मिळून देण्याकरीता "हिरकणी कक्ष" ची स्थापना करावी. मातांच्या व बाळाच्या आनंदा बरोबरच प्रसवानंद योजनेची अंमलबजावणी करावी व आनंद व्दिगुणीत करावा.

**क) आर्थिक सुचना :** हिरकणी कक्षात प्रसिध्दी करण्यासाठी लागणारे चार्ट, बोर्ड, इतर साधने करीता लागणारा खर्च रुग्ण कल्याण समितीची मान्यता घेवून एनएचएम अनुदानातून करावा.

**ड) प्रसिध्दी साहित्य :**

१) आरोग्य संस्थेत हिरकणी कक्षाची व्यवस्था असल्याची माहिती मातांना होण्यासाठी रुग्णालयाच्या आवारात हिरकणी कक्ष स्थापन झाल्याबददलचे प्रसिध्दी साहित्य व त्याची दिशा दर्शविणारे बोर्ड लावावे ज्यामुळे गरजु मातांना त्याचा लाभ घेता येईल.

२) हिरकणी कक्षाच्या भिंतीवर खालीलप्रमाणे चार्टस् लावावेत जेणेकरुन हिरकणी कक्षाला भेटी देणा-या माता ते वाचू शकतील व तिला काही समस्या असेल तर विचारु शकेल.

- स्तनपानाचे आईला होणारे फायदे, बाळाला होणारे फायदे,
- स्तनपानावरील योग्य पक्कड,
- बाळाला पाजण्याच्या पद्धती
- हाताने दुध काढण्याचे तंत्र
- पोषक पुरक आहाराचे तक्ते

**इ) मदर सर्पोट ग्रुपची अंमलबजावणी :-**

गावपातळीवरील स्तनदा व गरोदर मातांना माहिती कळावी यासाठी मदर सपोर्ट ग्रुपची स्थापना करणेची आहे. ही माहिती मातेने मातेला प्रसारीत करावी हा हेतू आहे.

१) गावपातळीवर मदर सपोर्ट ग्रुपसाठी मातांना प्रशिक्षीत करणेचे आहे.

२) प्रा.आ.केंद्रातील आरोग्य सहाय्यीकेने अंगणवाडी सहाय्यीकेना पुर्नप्रशिक्षीत करावे.

३) आरोग्य सहाय्यीकेने कार्यक्षेत्रातील उत्साही मातेला प्रशिक्षीत करावे.

४) माता बैठकिचे औचित्य साधून गाव स्तरावर किमान महिन्यातून तीनदा माहिती दयावी.

५) माहिती देण्याचे निश्चित ठिकाण, वेळ, गल्ली, वॉर्ड यांचे नियोजन माहेवार वर्षभराचे अंगणवाडी पर्यवेक्षीकेने करावे.

६) जास्तीत जास्त लसीकरणा दिवशी एकत्रीत मातांना बोलावून आरोग्य सहाय्यीकेने माहिती दयावी.

७) प्रशिक्षण साहित्य फिलप चार्टस् व बाहुली आपल्या स्तरावर उपलब्ध करुन घेणे.

**फ) रिर्पोटींग :-**

१) संबंधीत संस्थेने हिरकणी कक्षाची स्थापना करुन अहवाल तालुका आरोग्य कार्यालयास देणे.

२) तालुका आरोग्य कार्यालयाने अहवाल एकत्रित करुन जिल्हा प्रशिक्षण केंद्राकडे देणे.

३) संस्थेने देणेचा अहवालाचा नमुना.

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | जिल्हयात असणा-या आरोग्य संस्थाची नावे | हिरकणी कक्ष | | चालु महिन्यात हिरकणी कक्षात भेट दिलेल्या गरोदर व स्तनदा मातांची संख्या | चालु महिन्यात हिरकणी कक्षात आरोग्य साहाय्यिकेने घेतलेल्या समुपदेशन सत्रांची संख्या | हिरकणी कक्षात प्रसिध्दी साहित्याचे फलक लावले आहेत का? होय/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थापन केले आहे. होय/नाही | स्थापन असल्यास कार्यरत आहे. होय/नाही | | | |
| | | | | | | | |

ड) **सनियंत्रण :-**

१) प्रा. आ. केंद्र स्तरावरील वैद्यकिय अधिकारी व आरोग्य साहाय्यिका हे हिरकणी कक्षाचे व मदर सपोर्ट ग्रुपचे सनियंत्रण करुन अहवाल तालुका स्तरावर पाठवतील.

२) तालुका स्तरावरील हिरकणी कक्षाचे सनियंत्रण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी, परिचारीका करतील व अहवाल जिल्हास्तरावर पाठवतील.

३) जिल्हा स्तरावरील हिरकणी कक्षाचे सनियंत्रण, जिल्हा रुग्णालयातील पोषण पुनर्वसन केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, पोषण तज्ञ व परिचारिका करतील व ज्या जिल्हा रुग्णालयात पोषण पुनर्वसन केंद्र स्थापित नसेल अशा ठिकाणच्या हिरकणी कशाचे संनियंत्रण बालरोग विभागातील वैद्यकिय अधिकारी व परिचारिका करतील. तसेच योग्य मार्गदर्शन व सूचना देतील.

वरील सुचनांची अंमलबजावणी करुन "MAA" - Mothers' Absolute Affection कार्यक्रम व्यापक स्वरुपात राबविणेकरीता प्रयत्नशील राहणेचे आहे. जेणेकरुन अर्भक व बालमृत्यू कमी होणेस मदत होईल.

**अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,** (कारिता)
**कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे १.**

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर</u> :-

- मा. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य मुंबई.
- मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई.
- मा. मुख्य अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.